# 'मिसेस'च्या स्क्रीनिंगसाठी सान्या जाणार ऑस्ट्रेलियाला

बॉलीवूड अभिनेत्री सान्या मल्होत्रा सध्या तिच्या 'मिसेस' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ती अभिनयासोबतच नृत्यासाठीही खूप प्रसिद्ध आहे. इतकंच नाही, तर ती सोशल मीडियावर तिच्या फनी व्हिडीओसाठीही खूप लोकप्रिय आहे. आता सान्या तिच्या 'मिसेस' चित्रपटासाठी ऑस्ट्रेलियाला जाणार आहे. तिच्या या चित्रपटाचा 'मेलबर्न इंडियन फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये प्रीमियर होणार आहे. हा चित्रपट एका नर्तिकेच्या जीवनावर आधारित आहे. या चित्रपटात सान्याशिवाय कंवलजीत सिंग आणि निशांत दहिया यांच्याही मुख्य भूमिका आहेत. या चित्रपटाची निर्मिती ज्योती देशपांडे, पम्मी बावेजा आणि हरमन बावेजा यांनी केली आहे. सान्याला न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'मिसेस' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता. एवढेच नाही, तर या चित्रपटासाठी तिला IFFM २०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे नामांकनदेखील मिळाले. आता तिच्या या चित्रपटाचा प्रीमियर मेलबर्न इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये होत आहे. दिग्दर्शिका आरती कडव म्हणाल्या, 'मिसेस'चा प्रीमियर करण्यासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत. या चित्रपटात स्त्रीच्या जीवनातील सामाजिक समस्यांचे ज्वलंत चित्रण करण्यात आले आहे. १५ ते २५ ऑगस्टदरम्यान मेलबर्नचा इंडियन फिल्म फेस्टिव्हल आयोजित केला जाणार आहे.

